दै. पुण्यनगरी दि. 14.11.2019

दै. पुण्यनगरी दि. 14.11.2019



# बाल हक्कांबाबत जागरुक राहा- मगर

**नांदेड/ प्रतिनिधी**

बाल हक्कांबाबत प्रत्येक घटकाने जागरुक राहावे, असे प्रतिपादन पोलीस अधीक्षक विजयकुमार मगर यांनी केले आहे. नांदेड पोलीस दलाच्या वतीने पोलीस मुख्यालयातील आसना सभागृहात १३ नोव्हेंबर रोजी बाल हक्क जागृती कार्यशाळा घेण्यात आली. या वेळी मगर बोलत होते.

पोलीस अधीक्षक विजयकुमार मगर यांच्या मार्गदर्शनात बाल हक्क जागृती सप्ताह साजरा केला जात असून त्याचाच एक भाग म्हणून पोलीस विभाग, चाईल्ड लाईन, शिक्षण विभागांशी समन्वय साधून चर्चासत्र घेण्यात येणार आहेत. या सप्ताहांतर्गत बालकांचे हक्क, बाल कामगार, बाल विवाह, बालकांचे होणारे अपहरण, भिक्षुक बालक व त्यांच्या समस्या, महिला व मुलींवरील अत्याचार रोखणे, मिसींग व त्यामध्ये चाईल्ड लाईन व पोलिसांची भूमिका याबाबत पोलीस अधीक्षक विजयकुमार मगर यांनी मार्गदर्शन केले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून जेजीबीचे सदस्य डॉ. हरविंदरसिंग, डॉ. पी.डी. जोशी पाटोदेकर, सीडब्ल्यूसीच्या सदस्या ॲड. सावित्री जोशी, उपशिक्षणाधिकारी प्राथमिक यलपलवार, विद्या आळणे, संगीता



कांबळे उपस्थित होते.या कार्यशाळेस पोलीस उपाधीक्षक ए. डी. जाहरवाल, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी डोईफोडे, प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक कोलते, उपनिरीक्षक सविता खुर्जले, महिला सहाय्यता कक्ष, विशेष पोलीस बाल पथकाचे अधिकारी, कर्मचारी, सर्व पोलीस ठाण्याचे अधिकारी उपस्थित होते. बाल हक्क जागृती सप्ताह १४ ते २० नोव्हेंबरदरम्यान साजरा होत आहे.